# २० टक्के निर्यात शुल्काचा कांदा उत्पादकांना फटका

**लासलगाव। दि.२८ वार्ताहर**

जागतिक स्पर्धेत भारतीय कांद्याला चांगली मागणी असून देखील निर्यात शुल्कचे अडसर, निर्यातीबाबत केंद्र सरकारचे दीर्घकालीन धोरणाचा अभाव, बांगलादेश सरकारने कांदा आयातीवर आकारलेले शुल्क अशा अनेक कारणांमुळे कांदा निर्यातीतून आठ महिन्यात २ हजार ६६३ कोटींचा व्यवसाय झाला असून मागील वर्षीच्या तुलनेत ६९६ कोटींची तूट होऊन २० टक्के निर्यात शुल्काचा कांदा निर्यातीला फटका बसला आहे. गतवर्षाच्या तुलनेत आठ महिन्यात कांदा निर्यातीमध्ये तब्बल २० टक्के घट झाल्याचे अपेडाच्या आकडेवारीवरुन स्पष्ट होत कांदा उत्पादकांचे आर्थिक नुकतान झालेच आहे, परंतू देशाच्या परकीय चलनात यावरुन घट झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

भारतातून एप्रिल २०२४ ते नोव्हेंबर २०२४ या आठ महिन्यात कांदा निर्यातीतून २६६३ कोटी रुपयांचे परकीय चलन मिळाले. कांदा निर्यातीच्या धरसोड धोरणामुळे कांदा निर्यात व्यवसायाला मोठा फटका बसला आहे. कांदा हा देशाला मोठ्या प्रमाणात परकीय चलन मिळवून देणारे पीक आहे. केंद्र सरकारने कांदा निर्यातीला अनुकल धोरण ठेवले असते तर निर्यातीत लक्षणीय वाढ झाली असती. मात्र स्थानिक गरज लक्षात घेता सरकारने निर्यातीवर निर्बंध घातल्याने कांदा दरावर आणि निर्यातीवर मोठा परिणाम झाला आहे. मागील वर्षी एप्रिल २०२३ ते नोव्हेंबर २०२३ या आठ महिन्यात १६ लाख २६ मेट्रिक टन कांदा निर्यात होऊन ३३५९ कोटींचा व्यवसाय झाला होता. यंदा एप्रिल २०२४ ते नोव्हेंबर २०२४ या आठ महिन्यात कांदा निर्यातीतून २६६३ कोटी रुपयांचे व्यवसाय झाल्याचे अपेडाच्या आकडेवारीवरुन दिसून येते. मागील वर्षाच्या तुलनेत जवळपास ६९६ कोटी रुपयांचा व्यवसाय कमी झाल्याचे दिसून येत आहे.

लोकसभा निवडणूकीपूर्वी केंद्र सरकारने निर्यात शिथिलचा निर्णय घेतला. मात्र, आंतरराष्ट्रीय किमतीत झालेली घसरण आणि निर्यात शुल्क वाढीमुळे भारतातून कांदा निर्यात झाला नाही. कांदा निर्यातीवर गेल्या वर्षी ऑक्टोबरपासून निर्बंध घालण्यात आले होते. अपेक्षेपेक्षा कमी उत्पादनामुळे पुरवठा कमी झाला होता. शेतकऱ्यांसाठी या निर्यात बंदीमुळे किमती कमी झाल्यामुळे विरोध झाला. निर्यात खुली झाली मात्र जाचक अटीमुळे कांदा निर्यात मंदावली असल्याचे दिसून आले.

### मिळालेले परकीय चलन

| | | |
|---|---|---|
| २०१९-२० | - ११.४९ लाख टन | २३२० कोटी |
| २०२०-२१ | - १५.७७ लाख टन | २८२६ कोटी |
| २०२१-२२ | - १५.३७ लाख टन | ३४३२ कोटी |
| २०२२-२३ | - २५.२५ लाख टन | ४५२२ कोटी |
| २०२३-२४ | - १७.१७ लाख टन | ३९२२ कोटी |

कांदा उत्पादकांनी कष्टाने पिकविलेल्या कांद्यावर शुल्क आकारून लुट करण्यापेक्षा सरकारने व अधिकाऱ्यांनी स्वतःच कांदा पिकवावा. कांदा पिकवायचा शेतकऱ्यांनी आणि शुल्क लावून पैसे कमवायचे सरकारने, हे तर इंग्रज राजवटीपेक्षाही भयंकर काम सुरू आहे. सरकारने विना अटी व शर्ती निर्यात पूर्णता खुली केली पाहिजे.

भारत दिघोळे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटना

केंद्र सरकारचे आयत-निर्यात धोरण कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विरोधी सातत्याने कांदा पिकाबाबत घेण्यात येणाऱ्या या धरसोडवृत्तीच्या धोरणांमुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील देशाची पत तसेच व्यापारी आणि शेतकरी यांना मोठा फटका बसत आहे.

सचिन होळकर, कृषी तज्ज्ञ, लासलगाव

गेल्या अनेक वर्षांपासून कांदा निर्यातीच्या धरसोड धोरणामुळे परकीय बाजारपेठेत देशाचे स्थान डळमळीत होत आहे. चीन, इजिप्त आणि पाकिस्तानमधून कांद्याच्या उपलब्धतेमुळे भारताला फटका बसत आहे. यासाठी केंद्राकडून दीर्घकालीन निर्यात धोरण राबवणे आवश्यक असून कांद्यासाठी नवनवीन बाजारपेठा शोधणे गरजेचे असल्याचे कांदा निर्यातदारांचे मत आहे. बांग्लादेश, मलेशिया, श्रीलंका, नेपाळ, युनाईटेड अरब, इंडोनेशिया, कतार, हाँगकाँग, कुवेत, व्हिएतनाम आदी प्रमुख देशात कांदा निर्यात होत असते.

## महत्त्वाचे...

### सुकेणेत सावरकरांना अभिवादन



**कसबे सुकेणे।** मौजे सुकेणे मविप्र संचलित कर्मवीर रावसाहेब थोरात माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात थोर स्वातंत्र्य सैनिक विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यस्मरणनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य रायभान दवंगे होते. प्रारंभी प्राचार्य दवंगे, उपमुख्याध्यापक अनिल परदेशी, श्रीमती ज्योती कुशारे यांच्या हस्ते सावरकरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थी तेजस्वी गुरगुडे, वैष्णव जाधव, तन्मय पवार व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य दवंगे यांनी सावरकरांच्या कार्याची ओळख करून दिली. श्रेया सानप व कार्तिकी कडवे यांनी सूत्रसंचालन तर स्वरा काळे हिने आभार मानले. कार्यक्रमासाठी शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

### पिंपळसला मराठी भाषा गौरव दिन



**पिंपळस रामाचे।** येथील के.के. वाघ विद्याभवनात कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे व मराठी ग्रंथसंपदेचे पूजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका संगिता नाईक होत्या. यावेळी स्वाती सांगळे, दीपक कुंभार, छाया पवार, जगदीश देशमुख, योगेश सोनवणे आदी उपस्थित होते. मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधत गावातून ग्रंथदिंडी व महाराष्ट्रीयन पोशाखात विद्यार्थ्यांची शोभायात्रा काढण्यात आली. विद्यार्थी व शिक्षकांनी कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांची साहित्यसंपदा व मराठी भाषेची थोरवी मनोगतातून सांगितली. विद्यार्थ्यांनी विविध गीतांचे नृत्य व कवितांचे गायन करुन मराठी भाषेचा गौरव केला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी छाया पवार, जगदीश देशमुख, योगेश सोनवणे आदींसह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. सुवर्णा जाधव व पायल माळी यांनी सूत्रसंचालन तर सुवर्णा जाधव हिने आभार मानले.

### सायखेड्यात मराठी राजभाषा दिन

**चांदोरी।** मविप्र संचलित जनता इंग्लिश स्कूल, ज्युनियर कॉलेज आणि अभिनव बालविकास मंदिर सायखेडा यांच्या संयुक्त विद्यमाने कविवर्य कुसुमाग्रज जयंती व मराठी राजभाषा दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक नवनाथ निकम यांनी दीपप्रज्वलन केले. स्वामी कमलाकांतचार्य महाराज, विजय कारे, जगन्नाथ डेर्ले यांच्या हस्ते पालखीचे पूजन झाले. यावेळी राजेंद्र कुटे, सुरेश कमानकर, भगवान कुटे, प्रवीण कुटे, दिलीप शिंदे, अशपाक शेख, रामा कुटे, कवी जगताप, अभिनवच्या मुख्याध्यापिका बोरस्ते, उपमुख्याध्यापिका सुनीता नलावडे, पर्यवेक्षक राजोळे उपस्थित होते. वृषाली शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.

### महाशिवरात्रीनिमित्त हरिनाम सप्ताह

**विंचूर।** महाशिवरात्रीनिमित्त येथील शनैश्वर महाराज मंदिरात संताजी युवा प्रतिष्ठान, शनैश्वर तेली पंच कमिटी व विंचूरकर ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने अखंड हरिनाम सप्ताह व महाआरोग्य सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. महाआरोग्य सप्ताहाच्या सहाव्या दिवशी नामको हॉस्पिटलच्या सहकार्याने आयोजित हृदयरोग शिबीराचा ९२ रुग्णांनी लाभ घेतला. शिबिरात नाशिक येथील प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ.चेतन जैन व त्यांचे सहकारी डॉ.अनिश शहा, संदीप सांगळे, ऋषभ पांडव, प्रमिला गायकवाड, सोनाली गावित, रोशनी गायकवाड, निकिता गावित आदींनी रुग्णांच्या हृदयरोगासंबंधी ब्लडप्रेशर, रक्तातील साखर व ई.सी.जी. आदी तपासण्या केल्या. याप्रसंगी संताजी युवा प्रतिष्ठान पदाधिकारी, शनैश्वर तेली पंच कमिटी पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

### पिंपळगावला जयकर व्याख्यानमाला

**पिंपळगाव बसवंत।** व्यक्तिमत्व विकास म्हणजे फक्त बाह्य रूपाचं आकर्षण नव्हे, तर त्याच्या मागे असलेल्या विचारशक्ती, आचारधर्म आणि आत्मविश्वासाचा विकास आहे. एक व्यक्तिमत्व जितके शुद्ध आणि सकारात्मक विचारांनी परिपूर्ण असते, तितकेच ते समाजात प्रभावी आणि प्रेरणादायी ठरत असते. तुमचे व्यक्तिमत्व तुमच्या विचारांवर आधारित असते. जर तुमचे विचार सकारात्मक आणि प्रगल्भ असतील, तर तुमचे व्यक्तिमत्व देखील उज्ज्वल असेल. यासाठी जीवनात प्रत्येक विद्यार्थ्याने ध्येय निश्चित करून जिद्द, चिकाटी कठोर परिश्रम घेऊन ते मिळविता आले पाहिजे. त्या व्यक्तीच्या आंतरिक शक्तीतून सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे प्रतिपादन डॉ.भाऊसाहेब गमे यांनी केले. वाघ कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पिंपळगाव येथे बहि:शाल शिक्षण मंडळ अंतर्गत डॉ.बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेत 'व्यक्तिमत्व विकास' या विषयावर ते बोलत होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ.ज्ञानोबा ढगे, बहि:शाल व्याख्यानमाला प्रमुख डॉ.पोपट कुदनर, डॉ.पवनजय सुदेवाड, डॉ.ज्ञानेश्वर सातभाई, डॉ.संदीप माळी, डॉ.दीपा कुचेकर, डॉ.छाया भोज, प्रा.कुवरसिंग चव्हाण आदी उपस्थित होते.

### शिंगवेत गाडगे महाराज जयंती

**करंजी खुर्द।** शिंगवे येथे राष्ट्रसंत गाडगे महाराजांची १४९ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी गावातील उच्च पदस्थ अधिकारी म्हणून नोकरीस लागलेल्या सेवकांचा सन्मान करण्यात आला. अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी प्रभाकर रायते होते. प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार बाजीराव कमानकर, महाराष्ट्र राज्य परीट संस्थेचे माजी प्रदेशाध्यक्ष विजय देसाई, त्र्यंबकेश्वर धर्म शाळेचे माजी अध्यक्ष चाचा चौधरी, सरपंच सुशीला पवार उपस्थित होत्या. शिंगवे गावची पहिली सी.ए किमया बाळासाहेब रायते, प्रविण साहेबराव रायते, महसूल सहाय्यकपदी तर भुषण रोहिदास कटारे यांची मुंबई पोलीसपदी निवड झाल्याबद्दल सन्मान करण्यात आला. मान्यवरांनी संत गाडगे महाराज यांच्या जीवनाबद्दलचा लेखाजोखा मांडला. याप्रसंगी तंटामुक्ती समिती अध्यक्ष जगन विश्राम डेर्ले, माजी सरपंच भास्कर गिते, सरपंच निवृत्ती भागवत, उपसरपंच धोंडीराम रायते, कचुनाना शिंदे, कैलास डेर्ले, नामदेव सानप, शाहूल मोगल, प्रभाकर पवार, रामदास शिंदे, अर्जुन डेर्ले, सुदर्शन रायते, शांताराम जाधव, हभप संदीप महाराज रायते आदींसह परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते. संत गाडगेबाबा महाराज सामाजिक संस्था अध्यक्ष रवी सगर यांनी प्रास्ताविक तर भाऊलाल कटारे यांनी सूत्रसंचालन केले.

# जिल्हा भाजपचे पोलिसांना निवेदन

**निफाड । दि.२८ प्रतिनिधी**



नाशिक शहर व मालेगाव शहराबरोबर नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागातही बांगलादेशींची घुसखोरी वाढलेली आहे. पोलिसांनी त्या विरोधात कारवाई करावर,अशी मागणी असलेले निवेदन भाजपने पोलिसांना दिले आहे.

भाजप ग्रामीण जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघ यांच्या नेतृत्वात भाजप पदाधिकाऱ्यांनी ग्रामीण पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने यांच्या कार्यालयात सहाय्यक अधीक्षक आदित्य मिखिलेकर यांना निवेदन दिले

निवेदनात म्हटले आहे की, मागील काही महिन्यांपासून नाशिक महानगरात पोलिस बांगलादेशी नागरिकांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करत आहे. तसेच मालेगाव शहरातही घूसखोर सापडले आणि आणि सिन्नर औद्योगिक वसाहती काही घूसखोर सापडले. त्याच बरोबर देवळ्यात बांगलादेशी महिला वेश्या व्यवसायात आढळल्या आहेत. त्यामुळे ही गंभीर बाब आहे. हे लोण अन्य तालुक्यात व ग्रामीण भागात पोहचू नये, अशी मागणी त्यात करण्यात आली. नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण तालुके असलेले निफाड, नांदगाव, येवला, कळवण, सटाणा, दिंडोरी, पेठ, सुरगाणा आदी भागात नाशिक ग्रामीण पोलीस अधिक्षकांनी लक्ष घालून घडलेल्या घटनांना पायबंद घालण्यासाठी व पुढे घटना घडू नये, यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. घुसखोर करणाऱ्या नागरिक , महिलांवर व त्यांना आश्रय देणाऱ्या नागरिकांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावे, असे निवेदनात नमूद आहे.

यावेळी भाजप महिला जिल्हाप्रमुख महिला आघाडी सोनालीराजे पवार, जिल्हाध्यक्ष अतिश बैरागी, नाशिक जिल्हामंत्री आनंद बच्छाव, ओबीसी जिल्हाध्यक्ष विनायकराव खालकर, नाशिक जिल्हा उपाध्यक्ष आशुतोष लगड, सुबोध पाटील, दीपक भोजने, योगेश पालवे, माणिकराव कुंदे आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत निवेदन देतवेळी उपस्थित होते.

# पिकअप-कार अपघात तिघे जखमी


**निफाड। दि.२८ प्रतिनिधी**

निफाड तालुक्यातील पक्षी अभयारण्य असलेल्या नांदूरमध्यमेश्वर व शिवरे मार्गावर बुधवारी सायंकाळी ७ वाजेच्या दरम्यान सेवानिवृत्त न्यायाधीशाच्या खासगी वाहनास पिकअप वाहनाची जबरदस्त धडक बसून न्यायाधीशांसह त्यांची पत्नी व बहीण गंभीर जखमी झाली.

अपघाताचा गुन्हा निफाड पोलीसात दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार पुणे येथील सेवानिवृत्त न्यायाधीश संजय वासुदेव पाटील हे आपल्या टोयोटो कंपनीच्या अर्बन क्रूझर (एम.एच.३१ एफएक्स ०९३६) या वाहनातून आपल्या कुटुंबासमवेत चांदवड-सिन्नर मार्गावरील शिवरे, नांदूरमध्यमेश्वरकडे जात असतांना शिवरे गावाच्या अलिकडे (एम.एच.०४ सी.पी. ७८३०) या वाहतूक करणाऱ्या पिकअप वाहनाच्या चालकाने वाहन अचानक रस्त्यावर आणल्याने न्यायाधीशांच्या वाहन चालकाला काही कळायच्या आतच सदर वाहन अचानक आलेल्या पिकअप वाहनाला धडकले.

# ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी शिंदे बिनविरोध



**खडकमाळेगाव। वार्ताहर**

तालुक्यातील उत्तरपूर्व पट्ट्यातील खडकमाळेगांव खानगाव (नजिक) ग्रुप ग्रामपालिकेच्या उपसरपंचपदी वृषाली किरण शिंदे यांची नुकतीच बिनविरोध निवड करण्यात आली.

ग्रामपालिका कार्यालयात सरपंच जगदीश पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीत मावळत्या उपसरपंच निर्मला पोपटराव रायते यांनी आवर्तन पद्धतीनुसार आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. तो मंजूर झाल्याने उपसरपंच पदाच्या निवडीसाठी ग्रामपालिका कार्यालयात निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली होती. उपसरपंच पदासाठी वृषाली किरण शिंदे यांनी आपले नामनिर्देशनपत्र दाखल केले होते. त्यावर सूचक म्हणून ग्रामपालिका सदस्य अशोक माधव रायते यांनी सही केले होती. छाननीत नामनिर्देशनपत्र योग्य व बरोबर असल्याने ते मंजूर करण्यात आले. तसेच विहित मुदतीत फक्त एकच नामनिर्देशनपत्र दाखल झाल्याने वृषाली शिंदे यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी के.बी. बेंडके यांनी केली.

याप्रसंगी निर्मला रायते, शांताराम रायते, विकास रायते, निर्मला रायते, वंदना कान्हे, ज्ञानेश्वर नेहरे, रवींद्र शिंदे, संदीप गारे, अशोक रायते हे सदस्य उपस्थित होते. उपसरपंचपदी वृषाली शिंदे यांची बिनविरोध निवडीची घोषणा होताच उपस्थित सर्व समर्थकांकडून फटाक्यांची आतिषबाजी व गुलालाची उधळण करण्यात येत ग्रामस्थांच्या वतीने भव्य नागरी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी लासलगाव खरेदी विक्री संघ संचालक सुरेश रायते, लासलगाव कृउबा माजी संचालक दत्ता रायते, माजी सरपंच ॲड.विजय रायते, निफाड पंचायत समिती माजी सभापती सोमनाथ पानगव्हाणे, जिल्हा बँक माजी पर्यवेक्षक सुरेश शिंदे, लोकनेते दत्ताजी पाटील बँक संचालक विठ्ठल कान्हे, उत्तम शिंदे, किरण शिंदे, कैलास शिंदे, पोपट रायते, राजेंद्र शिंदे, माजी सरपंच बाळासाहेब रायते, अशोक रायते, भगीरथ रायते, कैलास रायते आदी उपस्थित होते.

# आज शाळा इमारत लोकार्पण

**पालखेड मिरचिचे। वार्ताहर**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत व एम्पथी फाउंडेशन मुंबई यांचे अर्थसहाय्यातून साकारलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श सेमी इंग्रजी शाळेच्या नूतन इमारतीचा लोकार्पण सोहळा व शाळेचा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव सोहळा आज शनिवार (दि.१) मार्च ३ वाजता जिल्हा परिषद आदर्श सेमी इंग्रजी प्राथमिक शाळा पालखेड मिरची येथे संपन्न होणार आहे.



माजी उपमुख्यमंत्री छगनराव भुजबळ, खासदार भास्करराव भगरे, आमदार दिलीपराव बनकर, एम्पथी फाऊंडेशन मुंबई मुख्य कार्यकारी अधिकारी एम.आर. सुंदरेश्वरम आदींच्या हस्ते इमारत लोकार्पण सोहळा संपन्न होत आहे. आ.बनकर यांचे अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून शिक्षणमंत्री दादा भुसे, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, अन्न औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ, माजी आमदार अनिल कदम, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी अशिमा मित्तल, शिक्षणाधिकारी नितिन बच्छाव, उपशिक्षणाधिकारी भास्कर कनोज, तहसीलदार विशाल नाईकवाडे, गटविकास अधिकारी टी.बी. जाधव, लता भरसट, वसंत गायकवाड, दिनेश झोरे, प्रशांत गायकवाड, कैलास बोरसे, सचिन चौधरी, पिंपळगाव पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक अग्निहोत्री, ठेकेदार योगेश गायखे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे. परिसरातील नागरिक व माजी विद्यार्थ्यांनी सोहळ्यास उपस्थित राहण्याची विनंती ग्रा.पं. सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, वि.का. सोसायटी चेअरमन, व्हा.चेअरमन, सर्व संचालक, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक जि.प. शाळा, अध्यक्ष, सर्व सदस्य शालेय व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक, सर्व शिक्षक न्यु इंग्लिश स्कूल, समस्त ग्रामस्थ पालखेड व जि.प. शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी केली आहे.

१८७५ मध्ये परिसरात पहिली शाळा म्हणून पालखेडला या शाळेची स्थापना झाली. शाळेत शिकलेले विद्यार्थी आज तालुक्यासह देशभरात विविध पदांवर कार्यरत आहे. चार-पाच पिढ्यांनी एकाच शाळेत शिक्षण घेतल्याने हा सोहळा बघण्याची प्रत्येकाला उत्कंठा असल्याचे माजी विद्यार्थी तथा पालखेड मिरची विद्यमान सरपंच शरद आहेर म्हणाले.

# शिवरात्रीनिमित्त १५ हजार गोण्या साबुदाना विक्री

**निफाड। दि.२८ प्रतिनिधी**

निफाड तालुक्यात जसे द्राक्ष, कांदा, बेदाणा, टोमॅटो प्रसिद्ध आहे, तसेच महाशिवरात्र उत्सव काळात अनेक वर्षापासून उपवासाठी होलसेल दराने विक्री होणारी साबूदाणा बाजारपेठे म्हणून निफाड प्रचलित आहे. यावर्षी निफाड शहरात शिवरात्रीनिमित्त जवळपास १२ ते १५ हजार साबूदाणा कट्ट्यांची विक्री झाली. त्यातून मोठी उलाढाल झाली.

तालुकाभरातून नव्हे तर राज्यभरातून वर्षभर पुरेल इतका साबूदाणा खरेदीसाठी नागरिक निफाड येथे येत असल्याने महाशिवरात्रीनिमित्त निफाड शहरात साबूदाणा विक्री ही गत एक महिन्यापासून सुरू असल्याचे निफाड शहरातील व्यापारी पवन चोरडिया यांनी दैनिक देशदूतशी बोलताना सांगितले. असा किरकोळ साबूदाणा ७० ते ८० रुपये किलो या दराने वर्षभर मिळत असतो. परंतु निफाड शहरात महाशिवरात्रीच्या पर्वकालावर निफाड येथील सर्वच होलसेल, घाऊक व किरकोळ विक्रेते हे अनेक वर्षापासून नागरिकांना होलसेल दरात साबुदाणा गोण्या महाशिवरात्रीला विक्री करतात. व्यापार दर्जेदार ब्रॅड असलेल्या विविध कंपन्यांचा साबुदाणा तामिळनाडू, आंध्रप्रदेश, केरळ येथून चारचाकी, सहाचाकी वाहनातून मागवत असतात. एक कटा २५ किलो, ३० किलो पॅकमध्ये उपलब्ध असतो. कटा खरेदी केला तर नागरिकांना किलोमागे २० ते २५ रुपयांचा फायदा होत असतो. वर्षभर पुरेल इतक्या आर्थिक कुवतीनुसार नागरिक साबुदाणा खरेदी करीत असतात. परंतु यावर्षी नागरिकांचा उत्साह दिसून आला नसल्याचे अनेक व्यापाऱ्यांनी प्रतिक्रिया देताना सागितले

# मराठी भाषा विकासासाठी कृतिशीलता गरजेची : गोराडे

**पिंपळगाव ब.। वार्ताहर**

मराठी भाषा ही आपल्या सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक आहे. या भाषेचे जतन, संवर्धन आणि प्रचार करणे हे आपले कर्तव्य आहे. मराठी भाषेने अनेक शतके आपल्या साहित्य, कला, संगीत आणि संस्कृतीला समृद्ध केले आहे. या भाषेच्या माध्यमातून आपल्या समाजाची एकजुटी आणि ताकद दर्शवली गेली आहे. मराठी भाषेची ताकद वाढवायची, तिला आधुनिक समाजामध्ये सक्षमपणे जिवंत ठेवायचे असेल तर त्या भाषेमध्ये कृतिशील अशा प्रकारचे उपक्रम व लेखन झाले पाहिजे. या लेखनासाठी आपल्याला आता आधुनिक युगामध्ये आंतरजालाचा सक्षम उपयोग करून घेता येईल व मराठी भाषेला बदलत्या काळातही तिच्या वाढीसाठी अनेक उपाय आपण केले पाहिजेत. यासाठी आपण सर्वांनी एकत्र येवून मराठी भाषेच्या विकासासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन कादंबरीकार संजय गोराडे यांनी केले.

मविप्र समाजाचे कर्मवीर काकासाहेब वाघ कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय पिंपळगाव बसवंत येथे मराठी विभाग आयोजित मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य दिलीप माळोदे, मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ.दत्तात्रय फलके, प्रा.नामदेव गावित, डॉ.ज्ञानेश्वर सातभाई, डॉ.पोपट कुदनर, प्रा.संदीप जगताप, प्रा.भरत जाधव आदी उपस्थित होते. अध्यक्षीय मनोगतात उपप्राचार्य दिलीप माळोदे म्हणाले, मराठी भाषेला अलीकडेच केंद्र शासनाने अभिजात भाषेचा दर्जा दिला. आता या भाषेत जास्तीत जास्त लोकांनी व्यक्त होणे, लिहिणे व राज्यकारभाराच्या दृष्टिकोनातून तिचा प्रत्यक्षात उपयोग करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले.

यावेळी सुप्रसिद्ध कवी संदीप जगताप यांनी मराठी भाषा दिनानिमित्त मनोगत व्यक्त करून ताज्या समकाळाशी हितगूज करणारी कविता सादर करत उपस्थितांना मराठी भाषेच्या ज्ञानाची मौलिक माहिती दिली. महाविद्यालयात निबंध व काव्यवाचन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. निबंध स्पर्धेत प्रियंका राजेंद्र आहेर हिने प्रथम तर धनश्री पुंडलिक शेळके हिने द्वितीय क्रमांक मिळवला. काव्यवाचन स्पर्धेत अनिकेत जाधव प्रथम तर अक्षय संजय जाधव याच्या कवितेस द्वितीय क्रमांक मिळाला. बक्षीसपात्र विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

डॉ.दत्तात्रय फलके यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा.नामदेव गावित यांनी सूत्रसंचालन तर प्रा.विकास बागलावे यांनी आभार मानले. याप्रसंगी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.